क्रिकेटच्या मानगुटीवर पुन्हा फिक्सिंगचे भूत

■ लॉर्ड्स कसोटी होती फिक्स? ■ विराट, रोहितच्या नावाने खळबळ

मुंबई : प्रतिनिधी–

क्रिकेटची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लॉर्ड्स स्टेडियमवर २०११मध्ये खेळली गेलेली भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी फिक्स होती, अशी धक्कादायक माहिती पुढे आली आहे. आयसीसीच्या रडारवर असलेल्या अनिल मुनवर या फिक्सरची चौकशी केली असता, त्याने हे कबूल केल्याचा दावा करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, भारताचा कर्णधार विराट कोहली आणि सलामीवीर फलंदाज रोहित शर्मा यांचे मुनवरबरोबर संबंध असल्याचे वृत्त प्रसिद्ध झाल्याने क्रिकेटविश्वात खळबळ उडाली आहे.

अल जजिरा वृत्तवाहिनीने जारी केलेल्या 'क्रिकेट मॅच फिक्सर्स : द मुनवर फाइल्स' या लघुपटात हा दावा करण्यात आला आहे. २०११-१२ या हंगामात एकूण १५ आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये तब्बल २६ वेळा स्पॉट फिक्सिंग झाल्याचेही समोर आले आहे. भारत-इंग्लंडदरम्यान लॉर्ड्सवर खेळली गेलेल्या कसोटीबरोबरच दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियादरम्यान खेळल्या गेलेल्या केपटाऊन कसोटीचाही यात समावेश आहे. मुनवरने ६ कसोटी, ६ एकदिवसीय सामने आणि ३ टी-२० सामन्यांत फिक्सिंग केली होती. कहर म्हणजे २०११ साली झालेल्या विश्वचषकातील पाच आणि २०१२ साली झालेल्या ट्वेन्टी-२० विश्वचषकातील तीन सामन्यांमध्येही फिक्सिंग झाल्याचे या डॉक्यूमेंट्रीमध्ये म्हटले गेले आहे. याशिवाय इंग्लंड-पाकिस्तानदरम्यान २०१२दरम्यान खेळले गेलेले तिन्ही कसोटी सामने फिक्स होते, असा दावा करण्यात आलाय.

'अल जजिरा'ने जारी केलेल्या या लघुपटात मुनवरची रेकॉर्डिंग आहे. दिनेश खंबतसोबत झालेले संभाषणही त्यात आहे. इंग्लंडच्या खेळाडूंनी सात सामन्यांत, ऑस्ट्रेलियाच्या खेळाडूंनी पाच सामन्यांत, पाकिस्तानच्या खेळाडूंनी तीन सामन्यांत आणि अन्य एका देशाच्या क्रिकेटपटूने फिक्सिंग केल्याचा आरोप आहे. या मुनवरबरोबर विराट आणि रोहित यांचे संबंध असल्याचे पुढे आले आहे. मुनवरसोबत या दोघांचे फोटोही प्रसिद्ध झाले आहेत. २०१२च्या ट्वेन्टी-२० विश्वचषकादरम्यान विराट आणि रोहित यांनी मुनवरबरोबर फोटो काढल्याचे डॉक्यूमेंट्रीमध्ये म्हटले गेले आहे.

या लघुपटात 'डी' कंपनीच्या एका व्यक्तीसोबत चर्चा करतानाचा उमर अकमलचाही फोटो आहे. दुबईतील पाकिस्तान-इंग्लंड कसोटीपूर्वीचा हा फोटो आहे. याच वर्षी अकमलला पाकिस्तान क्रिकेट बोर्डाच्या लाचलूचपत प्रतिबंधक युनिटसमोर हजर करण्यात आले होते.

आयसीसी करणार चौकशी

आयसीसीने या संपूर्ण प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, याची चौकशी करणार असल्याचे स्पष्ट केले आहे. या लघुपटातील कंटेन्ट पुन्हा तपासून त्यात करण्यात आलेल्या आरोपांची चौकशी करण्यात येणार आहे.

ग्लॅमर

मलायका-अर्जुन जोडी पुन्हा दिसली एकत्र

बॉलीवूडचे कथित कपल मलायका अरोरा आणि अर्जुन कपूर अलीकडे एका गाडीत दिसले होते. त्यापूर्वी लॅक्मे फॅशन वीकमध्ये हे दोघे एकत्र दिसले होते. 'इंडियाज गॉट टॅलेन्ट'च्या आठव्या पर्वाच्या प्रीमियरदरम्यानही अर्जुन व मलायका एकत्र दिसले आणि त्यांच्या रोमान्सच्या बातम्यांना पुन्हा जोर चढला.

मलायका ही 'इंडियाज गॉट टॅलेन्ट'च्या आठव्या सीझनची जज आहे. करण जोहर, किरण खेरसोबत ती हा शो जज करीत आहे. याच शोच्या पहिल्या भागात अर्जुन कपूर आणि परिणीती चोप्रा या दोघांनी नमस्ते इंग्लंड या चित्रपटाचे प्रमोशन केले.

या शोमध्ये प्रमोशनसाठी पोहोचलेल्या अर्जुनने नेमकी मलायकाच्या बाजूचीच सीट पटकावली. या वेळी दोघेही सेल्फी काढताना दिसले. केवळ इतकेच नाही; तर मलायका व अर्जुन दोघांनीही शोच्या स्टेजवर एकत्र डान्सही केला. मलायकाचा हात पकडून अर्जुनने तिला स्टेजवर नेले. या दरम्यान दोघांचीही केमिस्ट्री बघण्यासारखी होती.

...अन् विंडीजचे मनसुबे धुळीस मिळाले

VIRAT
18
OPPO
INDIA

गुवाहाटी : वृत्तसंस्था–

वेस्ट इंडिजचे ३२३ धावांचे आव्हान भारतीय संघाने ४२.१ षटकात दोन फलंदाजांच्या मोबदल्यात पार करून विंडीजचा पहिल्या एकदिवसीय सामन्यामध्ये आठ गड्यांनी धुव्वा उडवला. 'हिटमॅन' रोहित शर्माचे (१५२*) दमदार नाबाद दीडशतक आणि कर्णधार विराट कोहलीचे (१४०) आक्रमक शतकापुढे विंडीजच्या शिमरॉन हेटमायरची (१०६) शतकी खेळी व्यर्थ ठरली. दमदार लक्ष्य उभारून विजयाचे स्वप्न पाहणाऱ्या पाहुण्यांचे मनसुबे रोहित-विराटच्या महत्त्वपूर्ण भागिदारीने उधळले गेले.

पाच एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत भारताने १-० अशी आघाडी घेतली आहे. बरसापरा स्टेडियमवर नाणेफेक जिंकून भारतीय कर्णधार कोहलीने क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. गोलंदाजांनी हा निर्णय सार्थ ठरविताना विंडीजला सुरुवातीला ठराविक अंतराने धक्केही दिले, मात्र यानंतर हेटमायरने चौफेर फटकेबाजी करत केवळ ७८ चेंडूंत ६ चौकार व ६ षटकारांसह १०६ धावांचा तडाखा दिला. या जोरावर विंडीजने निर्धारीत ५० षटकांत ८ बाद ३२२ धावांची आव्हानात्मक मजल मारली होती.

विंडीजच्या आव्हानाचा पाठलाग करताना रोहित-शिखर धवन यांनी सावध सुरुवात केली. धवनने एक चौकार मारत धोक्याचा इशाराही दिला, मात्र दुसऱ्याच षटकात ओशाने थॉमसच्या गोलंदाजीवर त्रिफळाचीत होत त्याने तंबूची वाट धरली. यानंतर विंडीजचा आनंद फार वेळ टिकला नाही. रोहित-कोहली यांनी दुसऱ्या गड्यासाठी २४६ धावांची जबरदस्त भागीदारी करत सामना विंडीजच्या हातून हिसकावून घेतला. कोहली बाद झाल्यानंतर रोहितने अंबाती रायडूच्या (२२*) साथीने विजयाची औपचारिकता षटकार मारून पूर्ण केली.

टेबल टेनिस स्पर्धेत रायगडचे वर्चस्व

पनवेल : रामप्रहर वृत्त–

लायन्स क्लब ऑफ पनवेल आणि रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण व पश्चिम महाराष्ट्र रिजनल अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन नुकतेच नवीन पनवेल येथील सिडको समाज मंदिरात करण्यात आले होते. या स्पर्धेत रायगड जिल्ह्यातील खेळाडूंचे वर्चस्व पहावयास मिळाले.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष संजय सुदाम कडू यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या स्पर्धेत ३५० खेळाडूंनी सहाभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस असोसिएशनचे सचिव यतीन टिपणीस आणि लायन्स क्लब ऑफ पन्वेलच्या अध्यक्षा मीना पोतदार यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी लायन्स क्लब ऑफ पनवेलच्या सेक्रेटरी ज्योती देशमाने, खजिनदार भावना जेसवानी, उपाध्यक्ष शोभा गिल्डा, स्पोर्ट्स प्रोजेक्ट चेअरमन राजेंद्र जेसवानी, संजय पोतदार, नागेश देशमाने, अशोक गिल्डा आणि लायन्स व लिओ क्लबचे सदस्य उपस्थित होते.

स्पर्धा विविध गटांत घेण्यात आली. चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेमधील १० वर्षांखालील मुली व मुले आणि १२ वर्षांखालील मुली व मुले अशा चारही गटांत रायगड जिल्ह्याच्या खेळाडूंनी यश संपादन केले. स्पर्धेत मुख्य पंच डी. आर. साळसकर, पराग अंकोलेकर व राजेश कुरबेट यांनी काम पाहिले.

कोहलीचा 'विराट' पराक्रम

नवी दिल्ली : वृत्तसंस्था–

भारताचा कर्णधार विराट कोहलीने वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या एकदिवसीय सामन्यात तुफानी खेळी करताना मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरला मागे टाकत सर्वात कमी ३८६ डावांत ६० आंतरराष्ट्रीय शतके झळकावण्याचा पराक्रम केला. सचिनने ४२६ डावांमध्ये हा पल्ला गाठला होता.

याशिवाय कोहलीने एकाच कॅलेंडर वर्षात दोन हजार आंतरराष्ट्रीय धावा काढण्याचा पाचव्यांदा पराक्रम केला. सलग तीन कॅलेंडर वर्षात अशी कामगिरी करणारा कोहली तिसरा क्रिकेटपटू ठरला.

रोहितनेही मोडला सचिनचा विक्रम

या सामन्यात रोहित शर्माने नाबाद दीडशतक झळकावताना सचिनचा सर्वाधिक दीडशतकांचा विक्रम मोडला. सहाव्यांदा दीडशतक झळकावलेला रोहित एकदिवसीय क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा पहिला खेळाडू ठरला आहे. सचिन व ऑस्ट्रेलियाचा डेव्हिड वॉर्नर यांच्या नावावर प्रत्येकी पाच दीडशतकांची नोंद आहे.

मुरूडच्या मोहम्मद हमदूरेची महाराष्ट्राच्या संघात निवड

नागोठणे : प्रतिनिधी–

मुरुड जंजिरा येथील अंजुमान इस्लाम हायस्कूलचा विद्यार्थी मोहम्मद रजा खालिद हमदूरे याने क्रिकेट निवड चाचणी स्पर्धेत अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन केल्याने, त्याची २३व्या सब ज्युनियर राष्ट्रीय टेनिस बॉल क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ही स्पर्धा ३० ऑक्टोबर ते २ नोव्हेंबरदरम्यान नागपूर येथे होणार आहे.

या यशाबद्दल मोहम्मद व प्रशिक्षक सिद्धांत राणे यांचे अंजुमन शाळेच्या वतीने मुख्याध्यापक जाहीद हुसेन गोठेकर यांनी अभिनंदन केले. या वेळी शाळा संस्थेचे खजिनदार अल्ताफ हुसेन एन. मलिक, टेनिसबॉल क्रिकेट संघटनेचे सचिव संदीप गुरव, कलाशिक्षक लियाकत हसन धनसे आदींसह शिक्षकवृंद उपस्थित होता.

दुखापतीमुळे मेस्सी तीन आठवडे मैदानापासून दूर

बार्सिलोना : वृत्तसंस्था–

दिग्गज फुटबॉलपटू आणि बार्सिलोनाचा कर्णधार लियोनल मेस्सीच्या हाताला फ्रॅक्चर झाल्यामुळे तो तीन आठवडे मैदानापासून दूर राहणार आहे. या दुखापतीमुळे स्पेनिश लीगमध्ये पुढील आठवड्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी रियाल माद्रिदविरुद्ध होणाऱ्या सामन्यासाठी तो उपलब्ध होऊ शकणार नाही. त्याचप्रमाणे तो चॅम्पियन्स लीगमध्ये बुधवारी इंटर मिलानविरुद्ध आणि ६ नोव्हेंबरला इटलीत होणाऱ्या सामन्यातदेखील खेळू शकणार नाही.

मेस्सीला ही दुखापत कॅम्प नाऊ स्टेडियममध्ये सेविलाविरुद्ध झालेल्या स्पेनिश लीग सामन्यात झाली. दुखापतीआधी मेस्सीने गोलही केला होता. त्यामुळे बार्सिलोनाने ४-२ विजय मिळवला आणि गुणतालिकेत अव्वल स्थानावर झेप घेतली.

पनवेलच्या वर्धन म्हात्रेला तायक्वॉन्डो स्पर्धेत 'सुवर्ण'

PUSHP NIKETAN ENGLISH SCHOOL
PALE BUDRUK

पनवेल : प्रतिनिधी–

बालेवाडी (पुणे) येथे झालेल्या राष्ट्रीय तायक्वॉन्डो स्पर्धेतील सबज्युनियर गटात पनवेल तालुक्यातील वर्धन मच्छिंद्र म्हात्रे याने सुवर्णपदक पटकाविले आहे.

ओपन चॅम्पियन सेकंड मुंबई कौंसल जनरल कप २०१८ ही तायक्वॉन्डोची स्पर्धा नुकतीच पुण्याच्या बालेवाडी क्रीडानगरीत झाली. देशभरातील ४०० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले होते. यात पनवेल तालुक्यातील पाले बुद्रुक येथील पुष्प निकेतन इंग्लिश मीडियम स्कूलचा वर्धन म्हात्रे याने सबज्युनियर गटात सुवर्णपदक जिंकले. या यशाबद्दल शाळेच्या वतीने मुख्याध्यापिका रेवती नायर यांनी त्याला गौरविले. या वेळी त्याचे प्रशिक्षक मच्छिंद्र मुंढे आणि क्रीडा प्रशिक्षक वैभव पेटकर यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास शिक्षक-पालक संघटनेचे अध्यक्ष जनार्दन आगलावे व अन्य उपस्थित होते.

किशोर शिलदनकरने जिंकली मानाची राज्यस्तरीय कुस्ती

अलिबाग : रामप्रहर वृत्त–

सासवणे येथे शिलदनकर बंधू व ग्रामस्थ मंडळातर्फे आयोजित राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत स्थानिक किशोर शिलदनकर विरुध्द सांगलीतील सीताराम देवकाते यांच्यामधील कुस्ती स्पर्धेमध्ये किशोर शिलदनकर विजेता ठरला. त्यास १० हजार रुपये पारितोषिक व सन्मानचिन्ह देऊन मान्यवरांचे हस्ते गौरविण्यात आले.

या स्पर्धेदरम्यान राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कुस्ती पेहलवानांचा सन्मान करण्यात आला. या वेळी राजेंद्र ठाकूर, सुनील थळे, अलिबाग तालुका कुस्ती संघाचे अध्यक्ष जयेंद्र भगत, आयोजक विकास शिलदनकर आदी उपस्थित होते.

गंगटोक (सिक्कीम) : अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था मुंबई, महानगरपालिका/नगर परिषदांमधील लोकप्रतिनिधी आणि महिला बालकल्याण समितीच्या सभापती व महिला सदस्यांसाठी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने पनवेल महापालिकेचे नगरसेवक तेथे अभ्यास दौऱ्यासाठी गेले आहेत. त्याचे हे छायाचित्र.

मल्हार टीव्हीवर आज पहा...

सकाळी ७.०० वा.भजन, ८.वा. बातम्या, ९ वा. स्वच्छता सेवा संवाद पदयात्रेचा तिसरा टप्पा, १० वा. बातम्या, ११ वा. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे बूथ कमिटी अध्यक्षांना मार्गदर्शन (पुन:प्रक्षेपण), दुपारी ०१.३० वा. (पुन:प्रक्षेपण) डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशन आयोजीत धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळा, २.०० वा. बातम्या, ३ वा. मराठी चित्रपट, ५ वा. बातम्या, सायंकाळी ६वा. मेजवानी, ६.३० वा. अध्यात्मीक ज्ञान, ७वा. भक्तीगीते, ७.३०वा. वास्तू डॉक्टर-महेश सुर्वे, रात्री ८.०० वा. बातम्या, ९.०० वा. (पुन:प्रक्षेपण) नगरसेवक विजय चिपळेकर यांच्या जनसंपर्क कार्यालयाचा उद्घाटन सोहळा, १० वा बातम्या, ११ वा. मराठी चित्रपट (पुन:प्रक्षेपण)

- रायगडवासीयांचे विश्वासाई चॅनेल आता Youtube वर ही
- Malhar TV 24X7 पाहण्यासाठी आमच्या Youtube चॅनेलला Subscribe करा आणि बेल आयकॉन दाबून रहा अपडेट
- Malhar TV च्या Facebook पेजला लाईक करा आणि पहा ताज्या बातम्या
- मल्हार टीव्ही चॅनल पाहण्यासाठी आशीष केबल ७८४, डेन ॲरॉन ९८६, डेन केबल ८२२, स्पेस केबल ५५८ आणि इन केबलवर ९७७ या क्रमांकावर ट्युन करा आणि पहा मनोरंजन आणि बातम्यांचा खजिना... मल्हार टीव्ही

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सुमंगल प्रिंटर्स, प्लॉट नं. ए-५८७, टीटीसी इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई ४०० ७०१ येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, मुख्य संपादक : देवदास मटाले. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०१७-१९. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, फॅक्स ०२२-२७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com

विश्वस्त
रामशेठ ठाकूर